**पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग**

टिळक रोड, हिराकोट तलावाशेजारी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड-४०२२०१

दुरध्वनी कमांक-०२१४१-२२८४७३ ई-मेल - sp.raigad@mahapolice.gov.in

================================================================

## रायगड जिल्हा पोलीस शिपाई भरती सन २०२१

## लेखी परीक्षा संबंधी सर्वसाधारण सुचना

-----ooo-----

रायगड जिल्हा पोलीस शिपाई पदाकरीता दिनांक ०२/०४/२०२३ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली असुन सदर परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका दिनांक ०२/०४/२०२३ रोजी रायगड जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामध्ये दिनांक ०३/०४/२०२३ रोजी १३.०० वाजेपर्यंत ई-मेलव्दारे आक्षेप पाठविण्याबाबत प्रसिध्द करण्यात आले होते. त्यामध्ये एकुण **०५** प्रश्नांकरीता **१९** उमेदवारांमार्फत आक्षेप नोंदविण्यात आलेले असुन सदर आक्षेपांचे निरसन खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

---

**प्रश्न १)** खालील विधाने व अनुमाने यांचा अभ्यास करुन योग्य पर्याय निवडा .

विधान - काही झाडे जीप आहेत.
सर्व जीप दगड आहेत.

अनुमान - १) काही झाडे दगड आहेत. २) काही दगड झाडे आहेत.
३) सर्व दगड जीप आहेत. ४) काही जीप दगड आहेत.

**पर्याय :-** A) फक्त अनुमान १ व २ बरोबर B) फक्त अनुमान १, २ व ४ बरोबर
C) फक्त अनुमान २ व ३ बरोबर D) सर्व बरोबर

**आक्षेप :-** आकृतीप्रमाणे अनुमान १ आणि २ बरोबर येतो आणि अनुमान ३ व ४ चुकीचा येतो कारण विधानामध्ये सर्वच जीप दगड आहेत. म्हणुन काही जीप दगड होवु शकत नाही.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक B हे उत्तर बरोबर आहे.**

---

**प्रश्न २)** जेव्हा शुभ्र प्रकाश लोलकावर (Prism) आपाती असतो, तेव्हा वेगवेगळे रंग वेगवेगळया कोनातून वळतात. या सात रंगांपैकी कोणते रंग अनुकमे सर्वात कमी व सर्वात जास्त वळतात ?

**पर्याय :-** A) लाल रंग व पिवळा रंग B) नारंगी रंग व लाल रंग
C) जांभळा रंग व हिरवा रंग D) लाल रंग व जांभळा रंग

**आक्षेप :-** पुस्तकात योग्य उत्तर C आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक D हे उत्तर बरोबर आहे.**

---

**प्रश्न ३)** हवेत तरंगत्या अवस्थेत असलेल्या अतिसुक्ष्म जलकणांचा किंवा हिमस्फटीकांचा समुच्चय म्हणजे काय ?

**पर्याय :-** A) धुके B) धुरके C) ढग D) दव

रंग**आक्षेप** :- योग्य उत्तर A किंवा C दोन्हीही उत्तर बरोबर येतील.

**स्पष्टीकरण :- सदर प्रश्नाचे एका पेक्षा जास्त पर्याय बरोबर असल्याने, सर्व उमेदवारांना गुण देण्यात येत आहेत.**

---

**प्रश्न ४)** खालीलपैकी अकर्मक क्रियापद असणारे वाक्य कोणते.

अ) पिंटु खेळताना पडला.

ब) गाय दूध देते.

क) सुहास लाडू खातो.

ड) आजीने मला गोष्ट सांगितली.

**पर्याय :-** A) फक्त अ) B) फक्त ब) C) क) व ड) D) अ) व ब)

**आक्षेप :-** पर्याय कमांक B मधील पर्यायामध्ये कर्म येत नाही. D हे उत्तर योग्य राहील पुस्तकात असे दिले आहे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक A हे उत्तर बरोबर आहे.**

---

**प्रश्न ५)** वायुरुप पदार्थाचे द्रवरुप पदार्थात रुपांतर होण्याची प्रक्रिया म्हणजे-----?

**पर्याय :-** A) सांद्रीभवन B) बाष्पीभवन C) द्रवीकरण D) यापैकी नाही

**आक्षेप :-** उत्तर संघनन आहे, म्हणजे यापैकी पर्याय नाही. पर्याय A ऐवजी पर्याय D असायला पाहीजे.

**स्पष्टीकरण :- पर्याय कमांक A हे उत्तर बरोबर आहे.**

-----ooo-----